महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मध्ये करावयाच्या सुधारणांसंदर्भात शासनास शिफारशी सादर करण्याकरिता समिती गठित करण्याबाबत ...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : समिती-२०२६/प्र.क्र.१८२/एस.डी.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :-

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९, दि.२७.०८.२००९.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्र. पीआरई-२०१०/प्र.क्र.२१२ (बी) / पीई-१, दि. ११ ऑक्टोबर, २०११
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. आरटीई-२०२५ / प्र. क्र. ०८ /एसडी-१, दिनांक २९ जानेवारी, २०२५
४) शिक्षण संचालक तथा सदस्य सचिव यांचे पत्र क्र. प्राशिसं / आरटीई -८०१ / २०२५ /१४८६८२५, दिनांक १३.१०.२०२५
५) मा. सर्वोच्च न्यायालयाचे विशेष अनुज्ञा याचिका (दिवाणी) क्र. १०१०५/२०१७ मधील आदेश, दिनांक १३ जानेवारी, २०२६
६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. आरटीई-२०२५ / प्र. क्र. ०८ /एसडी-१, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६
७) शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F. No. 3-2/2025-IS.1, दिनांक ०४ जून, २०२६

प्रस्तावना :-

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अनुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम राज्यामध्ये दिनांक ०१ एप्रिल, २०१० पासून अंमलात आला आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या अनुषंगाने राज्य

शासनाकडून संदर्भ क्र. २ येथील अधिसूचना दिनांक ११.१०.२०११ अन्वये महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ तयार करण्यात आले आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या अनुषंगाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ तसेच, आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने दिनांक १५.०३.२०१३ अन्वये अधिसूचित केलेले नियम आणि त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा एकत्रित करून त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासंदर्भात आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शिक्षण संचालक (प्राथमिक) तथा सदस्य सचिव यांच्या संदर्भ क्र. ४ येथील दिनांक १३.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला होता. सदर अहवालातील शिफारशी विचारात घेऊन, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अनुसार संपूर्ण राज्यात शाळांमधील प्रवेशाच्या राखीव २५ टक्के जागांवरील प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्याबाबत संदर्भ क्र. ६ येथील शासन निर्णय दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ अन्वये कार्यपध्दती निश्चित करण्यात आली. या शासन निर्णयाद्वारे यासंदर्भातील यापूर्वीचा शासन निर्णय दिनांक १६ जानेवारी, २०१८ अधिक्रमित करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विहित करण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेच्या कार्यपध्दती विरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र. १७ / २०२६ दाखल करण्यात आली होती. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रवेश प्रक्रियेच्या कार्यपध्दतीमध्ये बदल करण्यात आला.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विशेष अनुज्ञा याचिका (दिवाणी) क्र. १०१०५ / २०१७ - दिनेश बिवाजी अष्टीकर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने आरटीई कायदा २००९ मधील नियमांमध्ये करावयाच्या बदलाबाबत संपन्न झालेल्या समितीच्या दिनांक २८.०४.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्र. ७ येथील दिनांक ०४ जून, २०२६ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे.

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत शासनास शिफारशी सादर करण्याकरिता आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासंदर्भात शासनास शिफारशी सादर करण्याकरिता आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

अ.क्र.	**पदनाम**	**समितीमधील पदनाम**
०१.	आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	अध्यक्ष
०२.	राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई	सदस्य
०३.	संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे	सदस्य
०४.	उपसचिव / सहसचिव (विद्यार्थी विकास), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
०५.	विधि सल्लागार, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
०६.	शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, पुणे	सदस्य
०७.	शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, पुणे	सदस्य सचिव

२. सदर समितीने मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विशेष अनुज्ञा याचिका (दिवाणी) क्र. १०१०५ / २०१७ - दिनेश बिवाजी अष्टीकर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने आरटीई कायदा, २००९ च्या नियमांमध्ये करावयाच्या बदलाबाबत संपन्न झालेल्या समितीच्या दिनांक २८.०४.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त तसेच आरटीई कायदा, २००९ मध्ये केंद्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना, जनहित याचिका क्र. १७/२०२६ मध्ये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी नोंदविलेली निरीक्षणे, राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मधील तरतूदी, सुधारित अभ्यासक्रम, शैक्षणिक मूल्यमापन, तसेच समितीस आवश्यक वाटणारे इतर मुद्दे विचारात घेऊन, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत शासनास शिफारशी सादर कराव्यात.

३. समितीने आपला अहवाल शासनास तीस दिवसांच्या आत सादर करावा.

४. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०८१११८२८५१९४४९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUSHAR VASANT MAHAJAN

Digitally signed by TUSHAR VASANT MAHAJAN
DN: c=IN, o=Personal, title=9656, 2.5.4.20=19c6c23f510a80926e9b7ee5db235979452f3f9e8918118634069a6cc7a22b9f, postalCode=400089, st=Maharashtra, serialNumber=1a39cef3c157b9ee6a2abe5779acf233682613f7b9c335d6bf4877267695ceca, cn=TUSHAR VASANT MAHAJAN
Date: 2026.08.11 18:30:01 +05'30'

(तुषार महाजन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र, मुंबई.

३. मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र, मुंबई.

४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

७. मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु., क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

८. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

९. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१०. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

११. सर्व मा. विधानपरिषद / विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई.

१२. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

१३. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१५. विभागीय आयुक्त (सर्व).

१६. जिल्हाधिकारी (सर्व).

१७. आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

२०.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

२१.संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

२२. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ, बालभारती, पुणे

२३.शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

२६. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).

२७. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना).

२८. निवडनस्ती (एसडी-४).